महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 12 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 228 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आपत्ती व्यवस्थापन समितीच्या नियमांत बदल



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यातील आपत्ती व्यवस्थापन समितीमधून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वगळण्यात आल्यामुळे महायुतीमध्ये धुसफुसी सुरु असल्याची चर्चा होती. एकनाथ शिंदे यांना समितीतून वगळल्याची चर्चा होताच राज्य सरकारने या निर्णयात बदल केला असून एकनाथ शिंदे यांचा आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये समावेश करण्यासाठी नियमात बदल केला जाणार आहे. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नियमात बदल केले जाणार आहेत. त्यानुसार आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री तर उपाध्यक्ष दोन्ही उपमुख्यमंत्री असतील, असा मोठा बदल करण्यात आला आहे. २०१९ च्या आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये मुख्यमंत्री आणि काही ठराविक मंत्री असतील, असा नियम होता. त्यामध्ये बदल करण्यात आला आहे. जुलै २००५ साली मुंबईत पुराने थैमान घातले होते. त्यावेळेस या समितीची स्थापना करण्यात आली होती. आपातकालीन परिस्थितीत ही समिती मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे काम करते. राज्याचा मुख्यमंत्री या समितीचा अध्यक्ष असतो. त्यानुसार आता या समितीच्या अध्यक्षपदी देवेंद्र फडणवीस हे आहेत. नव्या समितीमध्ये अर्थमंत्री अजित पवार यांच्यासह महसूल, मदत व पुनवर्सन, आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्य समितीच्या मंत्र्यांचा समावेश करण्यात आला होता. परंतु, एकनाथ शिंदे यांना या समितीमध्ये स्थान मिळाले नव्हते. यावरुन राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. यावरुन महायुतीत सर्व काही आलबेल नसल्याच्या चर्चा देखील सुरु झाल्या होत्या. एकंदरीतच महायुतीत कोणत्याही प्रकारची वितुष्टता येऊ नये म्हणून आता नियमात बदल करून एकनाथ शिंदे यांना या समितीमध्ये सहभागी करुन घेण्याचा निर्णय झाला आहे.

आजची मंत्रिमंडळाची बैठक आटोपल्यानंतर दिल्लीला जाणार आहेत. पुण्यातील सरहद संस्थेच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रतिष्ठेचा 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण दिल्ली येथे होणार आहे. दिल्लीत सायंकाळी सहा वाजता महाराष्ट्र सदनात हा गौरव पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. शरद पवार यांच्या हस्ते एकनाथ शिंदे यांना हा पुरस्कार मिळणार आहे. एकनाथ शिंदे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्यानिमित्त अजित पवार यांनी मंत्रालयात पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीन महत्वाचे निर्णय

१) देहरजी मध्यम पाट बंधारे प्रकल्प, ता. विक्रमगड, जिल्हा पालघरसाठी २५९९.१५ कोटी रुपयांचा सुधारित खर्चाला मंजूरी या प्रकल्पांतर्गत वसई-विरार महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्यासाठी ६९.४२ दलघमी पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. (जलसंपदा विभाग)

२) जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना ता. दौंड, बारामती आणि पुरंदर जिल्हे पुणे योजनेच्या पाणीपुरवठा यंत्रणेच्या रूपांतरणासाठी विस्तार आणि सुधारणा कामांतर्गत ४३८.४८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता जनाईतुन दौंड, बारामती, पुरंदर तालुक्यांचा दुष्काळी भाग ८३५० हेक्टर सिंचन बारामती, पुरंदरमध्ये दुष्काळामुळे ५७३० हेक्टर जमीन सिंचनाखाली (जलसंपदा विभाग)

३) आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नियमांत २०१९ मध्ये सुधारणा (मदत आणि पुनर्वसन विभाग)

थोडक्यात महत्वाचे

## खासदार बाळ्या मामांचे इन्स्टाग्राम हॅक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांचे इन्टाग्राम खाते हॅक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी त्यांचे निकटवर्तीय विपूल म्हात्रे यांनी नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज केल्यानंतर गुन्हा दाखल झाला आहे. इन्टाग्राम खाते पुन्हा सुरळीत सुरू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) भिवंडी लोकसभेचे खासदार बाळ्या मामा यांच्या नावाने इन्टाग्राम खाते आहे. या इन्स्टाग्राम खात्यावर बाळ्या मामा यांच्या विविध भाषणे आणि कार्यक्रमांविषयी पोस्ट केल्या जातात. दोन दिवसांपूर्वी त्यांच्या इन्टाग्राम खात्याचे इ-मेल खाते आणि परवलीचे शब्द चुकीचे दाखविले जात होते. इन्टाग्राम सुरू होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर विपूल म्हात्रे यांनी ठाणे पोलिसांकडे अर्ज केला होता. या अर्जानंतर हे प्रकरण नारपोली पोलीस ठाण्यात दाखल झाले. अर्जाची दखल घेऊन याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात इन्टाग्राम हॅक झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलसांनी दिली. बाळ्या मामा यांचे इन्टाग्राम खाते पुन्हा सुरळीत झाले आहे अशी माहिती पोलिसांनी दिली.

## अभय योजना ; केडीएमसीला ५०२ कोटी उत्पन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मालमत्ता कर व पाणीपटटीची थकबाकी असलेल्या नागरीकांसाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने दि.१४ डिसेंबर २०२४ ते दि.३१ जानेवारी २०२५ या कालावधीत अभय योजना २०२४-२०२५ जाहिर केली होती. त्यास नागरीकांकडून चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. या कालावधीत एकूण ३३७१९ थकीत करदात्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून, एकूण रु.२६४ कोटी वसूल झाले आहेत. कर वसुलीपोटी रक्कम रु.५०२ कोटी इतकी रक्कम जमा झालेली आहे.

थकीत मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा तातडीने व वेळेत करावा अन्यथा कराचा भरणा करण्यास टाळाटाळ मिळकतधारकांची नळजोडणी खंडीत करणे, मालमत्ता जप्ती करणे, अटकावणी करणे, मिळकतीचा लिलाव करणे यासारखी कठोर कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे. मोठी थकबाकी असलेल्या मिळकतधारकांना महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या नोटीसीला प्रतिसाद न दिलेल्या मिळकतींची जप्ती करण्यात आलेली असून, त्यातील १६ मालमत्तांचा जाहिर लिलाव करण्याची कार्यवाही सुरु आहे.

"मालमत्ता कर" थकविणा-या मालमत्ता धारकांविरुध्द, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे वसुलीची कटू कारवाई टाळण्याकरीता नागरीकांनी मालमत्ता कराचा भरणा त्वरीत करुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन मालमत्ता कर विभागामार्फत करण्यात आले आहे.

## मुरबाड नगरपंचायत नगराध्यक्षपदी संतोष चौधरी बिनविरोध



मुरबाड-प्रतिनिधी

मुरबाड नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष मुकेश बबन विशे यांनी राजिनामा दिल्या नंतर नगराध्यक्ष म्हणून काही दिवस उपनगराध्यक्षा मानसी देसले यांनी पदभार स्वीकारला.परंतु आज नविन नगराध्यक्ष बसविण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी रितसर अर्ज मागविण्यात आले होते. मुरबाड नगरपंचायत मध्ये आमदार किसन कथोरेंच्या अधिपत्याखाली भाजपाची एकहाती सत्ता असल्याने पुढील नगराध्यक्ष पदासाठी आज प्रभाग क्रं. 13 मधील भाजपाचे डॅशिंग नगरसेवक संतोष (बाबु) दिलीप चौधरी यांचा एकमेव अर्ज दाखल झाला असल्याने ते मुरबाड नगरपंचायतचे पुढील नगराध्यक्ष असणार आहेत यात कोणतीही शंका नाही. आज साह्हाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी मनोज म्हसे यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज स्विकारला व दुपारी 3.30 वा. छाननी केली असता त्यांचा अर्ज वैद्य असल्याने येत्या 13 फेब्रुवारी 2025 रोजी निवडणूक निर्णय अधिकारी रोहित कुमार रजपूत अधिकृत घोषणा करतील.

संतोष चौधरी यांची बिनविरोध निवड झाली असल्याने टि.डी.बँकेचे संचालक राजेश पाटील, अनिल वायले, सुधिर तेलवणे, नितीन मोहपे, माजी नगराध्यक्ष किसन कथोरे, मोहन सासे, रामभाऊ दुधाळे, नितीन तेलवणे, मनोज देसले, अतुल तेलवणे यांच्यासह सर्व नगरसेवक, नगरसेविका यांनी त्यांना पुढील नगराध्यक्ष पदाच्या शुभेच्छा दिल्या असून त्यांच्या प्रभाग क्रं. 13 मध्ये त्यांचे कुटंब, मित्र परिवार , मतदारांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## मलंगगडच्या फ्युनिक्युलरला मुहूर्त कधी ?

### एक तप संपले तरी प्रतीक्षाच

### उप मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातील महत्वाकांक्षी प्रकल्प का रखडला?






आमदार म्हणून लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या मलंगगडावर ये जा करण्यासाठी फ्युनीक्यूलर ट्रेन मंजूर केली, काम सुरु केले, आवश्यक परवानग्या मिळविल्या, मात्र मतदारसंघ बदलला आणि हे काम रखडत रखडत सुरु राहिले, शेवटी पुन्हा प्रयत्न केले काम अंतिम टप्प्यात आहे.
- आ किसन कथोरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ: लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीमलंग गडावरील कित्येक वर्षांपासून रेंगाळलेली फ्युनिक्युलर ट्रॉलीची प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. दरवर्षी माघी पौर्णिमला मलंगभक्त व शिवसैनिक मलंगगडावर दाखल होत येथे धार्मिक उत्सव साजरा केला जातो. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनानंतर फेब्रुवारीत माघी पौर्णिमेला ट्रॉलीची सुविधा भाविकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांनी अलीकडेच मलंगगडावर फ्युनिक्युलर ट्रॉलीने जात कामाची पाहणी करत गडावर मच्छिंद्रनाथांच्या समाधीचे दर्शन घेतले होते. 20 वर्षाचे स्वप्न पूर्णत्वास येत असल्याची भावना यावेळी आमदार कथोरे यांनी व्यक्त केली होती. अंबरनाथ तालुक्यातील श्री मलंग हे नवनाथांचे प्रसिद्ध धार्मिक क्षेत्र आहे. श्रीमलंगगड हा हिंदू व मुस्लिम धर्मीयांचे श्रद्धास्थान असल्याने वर्षभर गडावर भाविकांचा राबता असतो. सद्यस्थितीत गडावर जाण्यासाठी सुमारे अडीच हजार पायऱ्या आहेत.परंतु उभा चढ असल्याने भाविकांची दमछाक होते. भाविकांचे होणारी गैरसोय लक्षात घेऊन आमदार किसन कथोरे यांनी मलंगगडावर फ्युनिक्युलर ट्रॉलीचा प्रकल्प राबविण्याचा विचार केला.

परदेशात कथोरे यांनी हा प्रकल्प पाहिला असता भारतात तो राबविण्याची संकल्पना त्यांना सुचली. त्यांनी त्या दृष्टीने सर्व प्रयत्न सुरू केले. राज्य सरकारने या ठिकाणी फ्युनिक्युलर प्रकल्प राबविण्याचा निर्णयाला 2007 साली मंजुरी दिली. 2008 साली निविदा प्रक्रिया पार पडून 2012 ला कामास सुरवात झाली.मात्र 2014 मध्ये हे काम बंद पडल्याने त्याबाबत राजकीय उदासीनता दिसून आली यानंतर कल्याण लोकसभेचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी या कामाचा पाठपुरावा करत कामाला गती दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पहिल्या कंत्राटदाराची बदली करत वणी येथील कंत्राटदारास हे काम दिले.सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी देखील यात लक्ष घालत सातत्याने या कामाचा आढावा घेत हे काम पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न केले आहेत अखेर श्री मलंगगडावरील फ्युनिक्युलरचे काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच तो भाविकांसाठी खुला होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने बीओटी तत्त्वावर २००७ मध्ये मलंगगडावर फ्युनिक्युलर ट्रॉली बसवण्याचा निर्णय घेतला.२००८ मध्ये निविदा प्रक्रियेनुसार मेसर्स सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर कन्स्ट्रक्शन कंपनीला ४५ कोटी ९१ लाखांच्या प्रकल्पाचे काम देण्यात आले.कंपनीने दोन वर्षात हे काम पूर्ण करणे अपेक्षित होते; मात्र पर्यावरण, वन विभाग व इतर परवानग्या मिळवताना कंपनीची सहा वर्षे निघून गेली.केंद्र शासनाला १ कोटी ३० लाखांचा भरणा करण्यात आला. परवानग्या मिळाल्यावर २०१२ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.यामुळे डिसेंबर २०१५ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित होते; मात्र नैसर्गिक, तांत्रिक अडचणीसोबतच आर्थिक चणचणीमुळे काम पूर्ण झाले नाही.आमदार किसन कथोरे यांनी पाठपुरावा करून काम सुरू केले होते; मात्र कालांतराने मतदार संघाची विभागणी झाल्याने हा प्रकल्प आणखी रेंगाळला.

# कल्याणचे आरटीओ कार्यालय असुविधांचे आगार



### कल्याणच्या आरटीओ कार्यालयात सुविधांचा अभाव

### दलालांचा सुळसुळाट

कल्याण आरटीओ कडून मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्याकडे दुर्लक्ष, मुख्यमंत्र्याकडे तक्रार करणार!

- आमदार कुमार आयलानी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याणचे आर टी ओ कार्यालय असुविधाचे अगार बनले असून येथे दलालांचा सुळसुळाट सुरू आहे.. मुख्यमंत्र्यांच्या कृती कार्यक्रमाला या कार्यालयाने हरताळ फ़ासला आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नाही,,अस्थाव्यस्थ पडलेले भंगार, कच-याचे ढीग,नागरिकांना बसण्याची असुविधा. चौकशी खिडकीची दुरावस्था, नागरिकांना इकडून तिकडे मारावे लागणा-या चकरा, अधिकारी कर्मचाऱ्यांची उध्दठ उत्तरे, दलालांचा सुळसुळाट नागरिक परेशान,, असताना येथे येणाऱ्या वाहचालक असो की, लाईन्स धारक असो त्यांच्याशी बोलण्याचे साधे सौजन्या नसल्याचा अभाव, यामुळे कल्याण चे आर टी ओ कार्यालय म्हणजे असून अडचण नको ती कटकट या स्थितीत येथे येणाऱ्याला प्रत्येकाला सामोरे जावे लागते. हे कार्यालय नक्की कल्याण शहरांत आहे का? असा प्रश्न येथील नागरिकांना सतावत आहे. कल्याण उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अर्थात कल्याण आरटीओंना मुख्यमंत्री१००दिवस७ कलमी कृती आराखडयाचे वावडे आहे की काय?की यांना यातून सुट देण्यात आली आहे असा प्रश्न निर्माण होत आहे.तर लोकांना त्रास होत असेल, त्यांना सोईसुविधा मिळत नसतील तर मी स्वतः मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करतो असे आमदार कुमार आयलानी यांनी सांगितले. "क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा" या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दृक परिषदेद्वारे७कलमी कृती आराखडया बाबत निर्देश दिले होते, मात्र याचे कुठेही पालन अथवा अंमलबजावणी कल्याण आरटीओ कार्यालयात दिसून येत नाही, सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या कार्यालयाकडून शासनाला लाखो, कोटींचा महसूल मिळतो, पण ज्या नागरिकांच्या खिशातून वसूल केला जातो, त्यांच्या सोईसुविधाचे काय? कल्याण कार्यालयात कुठेही साधे पिण्याच्या पाण्याची सोय नाही, नानजीभाई ठक्कर ट्रस्ट ने लावलेले नळ केंव्हाच कोरडे पडले आहे, त्यांच्या लाद्या तुटलेल्या, फुटलेल्या आहेत, लर्निंग विभागात केवळ एक छोटा बाटला ठेवलेला आहे, परंतु बाहेर लाईनमध्ये उभा असलेला, व्यक्ती आतमध्ये पाणी पिण्यासाठी कसा जाणार?या कार्यालयात दररोज शेकडो नागरिक, आपल्या वाहनांच्या विविध कामासाठी संपूर्ण परिसरातून येत असतात, त्यांना माहित देण्यासाठी किंवा चौकशी करण्यासाठी चौकशी खिडकी नाही, हे काम आवक जावक खिडकीकडे सोपवले आहे, शिवाय त्यांच्या कडे इतर कामे दिल्याने ते या खिडकीत कधी येतात, हे त्यांना च माहिती, आज तर १२:२२मिनिटे झाली तरी ही खिडकी रिकामीच होती, या ठिकाणी एकूण २०/२५खिडक्या आहेत, त्यामुळे लोकांना इकडून तिकडे चकरा माराव्या लागतात, इतके झाल्यावर ही काही कर्मचारी केवळ मोबाईल वँटसेफ वर बीजी असल्याने लोकांना मात्र ताटकळत उभे राहावे लागते.लाईनमध्ये उभे राहून हे नागरिक आत मध्ये गेल्यावर अधिकारी, कर्मचारी ओळख पत्रे, पाहून झाल्यावर अपमानास्पद टाकून देतात, नवीन गाड्या पासिंग साठी नांदीवली येथे गेल्यावर तेथे साहेबांचा पत्ताच नसतो? त्यामुळे वेळ, पैसा खर्च होईनही काम होत नाही, पूर्वी 'अगोदर काम नंतर दाम, असे होते, परंतु आता अगोदर दाम देऊनही काम वेळेवर, व व्यवस्थित, होईल याची गँरटी अजिबात नसते,एकूणच येथील कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांवर वरीष्ठ अधिका-यांचा अजिबात कंट्रोल/दबदबा दिसून येत नाही,त्यामुळे कल्याण आरटीओ यांना मुख्यमंत्री १०० दिवसांच्या ७ कलमी कृती आराखड्याचे वावडे आहे की काय?की यांना यातून वगळण्यात आले आहे हे समजत नाही, याबाबत कल्याण आरटीओ आशुतोष बारकुल यांना विचारले असता, बदल दिसेल, मनुष्यबळ कमी आहे, पाण्याची सोय आहे असे म्हणून खांदे उडवले, परंतु याबाबत जनतेतून तसेच राजकीय स्थरातून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होत आहे

मुख्यमंत्र्यांच्या१०० दिवसांमध्ये १ संकेतस्थळ २, सुकर जीवनमान ३ स्वच्छता ४ जनतेच्या तक्रारींचे निवारण ५ कार्यालयातील सोयी व सुविधा, ६ गुंतवणूक प्रसार ७ क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या मुद्यांवर प्रभावी कार्यवाही होईल असे वाटत नाही

## गीतासार



बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥२-५०॥

समबुद्धीचा पुरुष पुण्य व पाप या दोहोंचाही याच जगात त्याग करतो. अर्थात त्यापासून मुक्त असतो. म्हणून तू समत्वरूप योगाला चिकटून राहा. हा समत्वरूप योगच कर्मांतील कौशल्य आहे, म्हणजेच कर्मबंधनातून सुटण्याचा उपाय आहे. ॥ २-५० ॥

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।
जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥२-५१॥


कारण समबुद्धीने युक्त असलेले ज्ञानी लोक कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या फळाचा त्याग करून जन्मरूप बंधनापासून मुक्त होऊन निर्विकार परमपदाला प्राप्त होतात. ॥ २-५१ ॥

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥२-५२॥

जेव्हा तुझी बुद्धी मोहरूपी चिखलाला पूर्णपणे पार करून जाईल, तेव्हा तू ऐकलेल्या व ऐकण्यासारख्या इह-पर लोकातील सर्व भोगांपासून विरक्त होशील. ॥ २-५२ ॥

## आरोग्य टिप्स

### व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे होणाऱ्या समस्या



१. त्वचेच्या समस्या: व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे त्वचा कोरडी, खडबडीत आणि सुरकुत्या पडू शकते. यामुळे एक्झिमा, सोरायसिस आणि इतर त्वचेच्या समस्या देखील वाढू शकतात.
२. डोळ्यांच्या समस्या: व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे अंधुक दृष्टी, रात्रीची दृष्टी कमी होणे आणि मोतीबिंदू यासारख्या समस्या उद्भवू शकतात.
३. स्नायू कमकुवत होणे: व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे स्नायू कमकुवत होणे, वेदना आणि पेटके येऊ शकतात.
४. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होणे: व्हिटॅमिन ईची कमतरता रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करू शकते, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो.
५. हृदयरोग: व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे हृदयरोगाचा धोका वाढू शकतो.
६. मज्जासंस्थेच्या समस्या: व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे मज्जासंस्थेच्या समस्या जसे की न्यूरोपॅथी होऊ शकते.
७. निद्रानाश: व्हिटॅमिन ई च्या कमतरतेमुळे निद्रानाश होऊ शकतो.

**व्हिटॅमिन ईची कमतरता दूर करण्याचे मार्ग:**

पौष्टिक आहार: व्हिटॅमिन ई समृद्ध असलेले पदार्थ खा. यामध्ये समाविष्ट आहे... सूर्यफूल बियाणे, बदाम, अक्रोड, हिरव्या पालेभाज्या, ब्रोकोली, पालक, गाजर, टोमॅटो, बटाटा, शेंगा

उन्हात राहणे: उन्हात राहिल्याने शरीरात व्हिटॅमिन डी तयार होते, जे व्हिटॅमिन ई शोषण्यास मदत करते.

ताण कमी करणे: ताण शरीरात मुक्त रॅडिकल्सची पातळी वाढवू शकतो, ज्यामुळे व्हिटॅमिन ईची गरज वाढते. ताण कमी करण्यासाठी योगासने, ध्यानधारणा आणि व्यायाम करा.

# दहावी परीक्षेचे वेळापत्रक



महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (MSBSHSE) त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर महाराष्ट्र SSC वेळापत्रक 2025 सादर केले आहे. इयत्ता दहावीचे विद्यार्थी MSBSHSE या अधिकृत वेबसाइटवर म्हणजेच https://www.mahahsscboard.in/ वर परीक्षेचे वेळापत्रक पाहू शकतात.

दहावीच्या परीक्षेचे वेळापत्रक कसे पाहावे किंवा या वेळापत्रकाची PDF कशी डाउनलोड करावी, याविषयी आज आपण सविस्तर जाणून घेणार आहोत.

दहावीच्या परिक्षेच्या वेळापत्रकाची PDF डाउनलोड कशी करावी?

महाराष्ट्र बोर्डाने २०२५ साठी एसएससी (इयत्ता 10) परीक्षेचे वेळापत्रक सादर केले आहे. विद्यार्थी हे वेळापत्रक अधिकृत वेबसाइट www.mahahsscboard.in वरून PDF स्वरूपात डाउनलोड करू शकतात. या परीक्षेच्या तारखा तपासून विद्यार्थी अभ्यासाची तयारी सुरू करू शकतात. वेळापत्रक डाउनलोड करून कोणत्याही नवीन नोटिफिकेशनबाबत अपडेटेड राहणे आवश्यक आहे. परीक्षेचे वेळापत्रक मिळवण्यासाठी वेबसाइटला भेट द्या आणि महाराष्ट्र बोर्डाच्या इयत्ता 10वीच्या परीक्षेसाठी अभ्यासाचे चांगले नियोजन करा.

यंदा शैक्षणिक सत्र २०२४-२५ च्या दहावी परीक्षेमध्ये सुमारे १३ लाख विद्यार्थी परीक्षा हॉलमध्ये बसतील अशी अपेक्षा आहे. या सर्व विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र बोर्डाने इयत्ता १० वी चे टाइम टेबल अधिकृत वेबसाइटवर दिलेले आहे. २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ दरम्यान ही परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षा सकाळी ११ ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ६ या दोन शिफ्टमध्ये घेतल्या जातील.

महाराष्ट्र बोर्ड SSC टाइम टेबल २०२५ डाउनलोड करण्यासाठी खालील स्टेप्स जाणून घ्या

स्टेप १ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (MSBSHSE) https://www.mahahsscboard.in/ या अधिकृत वेबसाइटला भेट द्या

स्टेप २ : नवीन नोटिफीकेशन जाणून घेण्यासाठी होम पेज खाली स्क्रोल करा

स्टेप ३ : त्यानंतर महाराष्ट्र बोर्ड SSC टाइम टेबल २०२५ या लिंकवर क्लिक करा.

स्टेप ४ : महाराष्ट्र बोर्ड SSC टाइम टेबल २०२५ स्क्रीनवर दिसेल.

स्टेप ५ : वेळापत्रक तपासा आणि डाउनलोड करा.

# शिक्षण शास्त्र महाविद्यालयात संशोधन पद्धतीवर कार्यशाळा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ८ फेब्रुवारी २०२५ रोजी जनसेवा शिक्षण मंडळ, शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिवळे येथे 'शालेय व्यवस्थापन पदविका' (DSM) विद्यार्थ्यांचे स्वागत, एक दिवसीय संशोधन पद्धती कार्यशाळा आणि पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला.

सदर कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष व संस्थापक माजी आमदार गोटीरामभाऊ पवार , संस्थेचे सचिव पांडुरंग कोर , सहसचिव बि.आर. हरड , प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ संजय शेडमाके एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई, पी.व्ही. डी. टी.कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमन मुंबई उपस्थित होते.तसेच डॉ. राकेश रामराजे, डॉ. अनुजा शेट्टी, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.सी. राठोड, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम ए बडगुजर , मुख्याध्यापक यशवंत धलपे सर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलाने कार्यक्रमाचे सुरुवात झाली. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षभरातील बीएड डिएसम (B.Ed, DSM) कार्यक्रम/ उपक्रमाचे पीपीटी द्वारे सादरीकरण करण्यात आले. स्वागत व परिचयानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. सी. राठोड प्रास्ताविकेतून कार्यक्रमाची रूपरेषा मांडले.शालेय व्यवस्थापन पदविका विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.सी. राठोड यांच्या २.संशोधन पदधती व तंत्रे,२. शैक्षणिक संप्रेषण व तंत्रविज्ञान या दोन पुस्तकांचे प्रकाशन व प्रा. अर्चना भालेवार यांच्या १.मराठी आशय अध्यापन पद्धती,२. शैक्षणिक व्यवस्थापन या दोन पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.अध्यक्षांनी शुभ संदेश दिले.

दुपार सत्रात संशोधन पद्धती कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ता म्हणून लाभलेले डॉ. राकेश रामराजे यांनी विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प संदर्भात व आराखडा बाबत मोलाचे मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती कार्यशाळेचे प्रमाणपत्र वाटप मुख्याध्यापक यशवंत धलपे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. बी.एड छात्रअध्यापक आणि डी.एस.एम विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी,बीएड प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र अध्यापक, डी एस एम विद्यार्थी उपस्थित होते. आयसीटी चे काम प्रांजल पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भगवान विशे सर यांनी केले तर प्रा. धनाजी खापरे आभार प्रदर्शन केले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# छ.संभाजी महाराज मैदानात खेळांच्या स्पर्धा व्हाव्यात

**– सी.आर.म्हात्रे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : क्रिकेट साठी बऱ्याच प्रयत्नाने,कष्टाने तयार केलेले मैदान विविध खेळासाठी उपयुक्त ठरतं आहे.मुलांना खेळासाठी प्रशस्त मैदान या खारेपाट विभागात नव्हते पण आज मात्र त्याची पूर्ती झाली आहे.

कबड्डी चा जन्म हुतूतू पासून झाला अभिमानाची बाब म्हणजे सर्वात अगोदर महान असे महाराष्ट्राचे नाव पाहिले येते. प्राचीन काळात जरी हा खेळ होता असे सांगण्यात येते असला तरी खरा उगम महाराष्ट्रात झाला.२० व्या शतकात खरा नावारूपाला आला आणि स्पर्धात्मक खेळ ठरला.पंजाब कबड्डी ज्यास वर्तुळ शैली असे संबोधली जाते. बाहेर गोलाकार मैदानात खेळला जातो. दुसरे मानक शैली जो आयाताकृती कोर्टवर खेळला जातो. आणि हीच शैली आंतर राष्ट्रीय स्पर्धांमध्ये वापरली जाते. आंध्रप्रदेशात चेदुगुदू, केरळ ,महाराष्ट्र ,कर्नाटक कबड्डी, बांगला देश, हादुदू,किंवा काबडी,पंजाब कौद्दी, पश्चिम भारत हुतूतू, दक्षिण भारत चटकूडू' नेपाळ कापर्डी 'तामिळनाडू सादुगूडू काबडी अशी विविध नावाने हा खेळ ओळखला जातो.

१९३४ मध्ये खेळाचे नियम तयार झाले.१९३६ मध्ये हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती याने या खेळाच्या प्रसारासाठी बर्लिन ऑलिम्पिक मध्ये प्रदर्शनीय सामना खेळून दाखविला.१९३८ कबड्डीला राष्ट्रीय दर्जा मिळाला१९५० मध्ये अखिल भारतीय कबड्डी संघ स्थापन झाला.मात्र महाराष्ट्राचेच नियम सर्वत्र लागू झाले. विशेष म्हणजे महिला आणि पुरुष संघांनी विश्व कप जिंकला आहे.आत्ता तर प्रो कबड्डीमुळे या खेळाला नवसंजीवनी,रस संजीवनी मिळाली आहे. पूर्वी मातीत खेळला जाणारा हा खेळ मॅटवर खेळत आहेत पण बऱ्याच ठिकाणी मातीत खेळत आहेत. पवन सेह रावत ,अनुपकुमार,राहुल चौधरी,विजय म्हात्रे अशी बरीच नावे पुरुष संघांनी गाजवलीआहेत.अभिलाषा म्हात्रे,दिपाली जोसेफ. ही प्रसिद्ध आहेत. जुन्या काळात दापोली येथील बाबू लाले हा प्रसिद्ध खेळाडू मुंबई येथील संघ जेव्हा जगदंबा मंदिर वाशी येथील मैदानात खेळला होता.हे अजून आठवते त्यांचा संघ अमर भारत असे होते. क्रिकेट या संघाला जसे प्रेक्षक लाभतात तसेच या खेळाला लाभत आहेत. महत्वाचं मुद्दा हा की या छत्रपती संभाजी महाराज या मैदानातून या पुढे विविध खेळाचे आयोजन करून तरुण मुलांना भविष्यातील ऑलंपिकमध्ये जाणारे स्पर्धक निर्माण झाले पाहिजे. शाळेतील हिवाळी सामने या मैदानात झालेपाहिजे. आत्ताच या व्यासपीठावर विविध पक्षांचे नेते यामध्ये खासदार सुनील तटकरे खासदार धैर्यशील पाटील,महाराष्ट्राचे मंत्री भरतशेठ गोगावले मंत्री आदिती तटकरे आमदार रविंद्र पाटील आमदार प्रशांत ठाकूर आमदार महेंद्र दळवी येऊन गेले त्यांनी या मैदानाचे रूपांतर,कायापालट करून राष्ट्रीय खेळ यासाठी कसा करता येईल यासाठी सरकारतर्फे निधी उपलब्ध करावे आणि या विभागाला एक सुखद धक्का दिला तर बरे होईल.मात्र यासाठी जागेची मालकी कोणाची...येणारे प्रकल्प महामुंबई. यांच्यासाठी ही सोन्याची खाण आहे.सरकार संपादन कोठेही कधीही करू शकतं.मात्र यापुढे संयोजक यांनी विविध प्रकारचे खेळ आयोजित करून खेळातून करियर करता येईल आणि मुलांना नोकरीसाठी याचा उपयोग होऊ शकेल एवढी अपेक्षा. लगेचच घडणार नाही पण पाठपुरावा केला ,आणि आपल्या लोकप्रतिनिधींनी यासाठी दम लागेपर्यंत प्रयत्न करावा असे वाटते अशी मागणी वाशी खारेपाटातील खेळाडूंच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते सी.आर म्हात्रे यांनी केली आहे.

# जपानची कार्य संस्कृती जगात सर्वोत्तम - राज्यपाल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जपानचे लोक परिश्रमी, प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ असून जपानची कार्य संस्कृती जगात सर्वोत्तम आहे. हिरोशिमा व नागासाकी शहरे बेचिराख झाल्यानंतर ज्या निर्धाराने जपान नव्या उमेदीने उभा ठाकला, ते अतिशय कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी काढले.

जपानचे सम्राट नारुहितो यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त मुंबईतील जपानच्या वाणिज्य दूतावासातर्फे सोमवारी (दि.१०) हॉटेल ताजमहाल, मुंबई येथे एका स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.कारचा शोध अमेरिकेत लागला असला तरी जपानमध्ये तयार झालेल्या कार गुणवत्तेच्या बाबतीत जगात सर्वोत्कृष्ट व आरामदायी असतात. जपान देशात निर्माण झालेले प्रत्येक उत्पादन गुणवत्तेच्या कसोटीवर पूर्णपणे खरे उतरल्याशिवाय जपान ती वस्तू बाजारात आणत नाही, ही गोष्ट शिकण्यासारखी आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

राज्यातील अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प, विशेषतः अटल सेतू , मुंबई मेट्रो लाईन, बुलेट ट्रेन यांना अर्थसहाय्य करीत असल्याबद्दल राज्यपालांनी जपान सरकारप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

भारत आणि जपानमध्ये अनेक शतकांपासून सांस्कृतिक, अध्यात्मिक व तत्वज्ञान विषयक संबंध दृढ असून उभय देशांमध्ये पर्यटन विशेषतः अध्यात्मिक पर्यटन तसेच वैद्यकीय पर्यटन पर्यटनाला चालना देणे आवश्यक असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

भारत आणि जपान मधील संबंध स्वाभाविक आणि राजनीतिक दृष्टीने महत्त्वाचे असून आज उभय देशांमध्ये आर्थिक, व्यापार विषयक तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहकार्य नव्या उंचीवर गेले आहे. महाराष्ट्राने पायाभूत सुविधा क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असून जपान तर्फे दिल्या जाणाऱ्या मदतीचा सर्वात मोठा लाभार्थी महाराष्ट्र असल्याचे जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत यागी कोजी यांनी यावेळी सांगितले.भारतातून गेल्यावर्षी २.३० लाख पर्यटक जपानला गेले असून ही पर्यटक संख्या वाढवण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात भारत व जपानच्या राष्ट्रगीताने करण्यात आले. जपानचे सम्राट नारुहितो यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य लाभावे या शुभेच्छा देण्यात आल्या.

या प्रसंगी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईतील जपानचे वाणिज्यदूत यागी कोजी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, उद्योगक्षेत्रातील प्रमुख व्यक्ती तसेच विविध देशांचे वाणिज्यदूत उपस्थित होते.

# शेलारी गावात श्री हनुमान मंदिर जीर्णोद्धार सोहळा संपन्न



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील शेलारी गावात नुकतच श्री हनुमान मंदिर जीर्णोद्धार सोहळा संपन्न झाला. यावेळी शेलारी गावातील श्री हनुमान मंदिराचा कलशारोहण कार्यक्रम संपन्न झाला . ८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०२५ यादरम्यान हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध प्रकारचे धार्मिक आणि परमार्थिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. हे कार्यक्रम गावाच्या वतीने राबवण्यात आले. कळसपूजन, गंगापूजन, ग्रामप्रदक्षिणा, हरिपाठ, श्री खांबलिंगेश्वर प्रासादिक भजन मंडळ म्हसा यांचे भजन आदी कार्यक्रम पहिल्या दिवशी संपन्न झाले. यावेळी भजनभूषण भाऊबुवा कुरले यांच्या मधूर आवाजाचा गावकऱ्यांनी लाभ घेतला या कार्यक्रमाला रमेश म्हाडसे आणि ललित कुरले यांनी साथ दिली . मूर्ती संस्कार, होमहवन, हरिपाठ, हरिभक्ती पारायण ज्ञानेश्वर महाराज कदम छोटे माऊली यांचे कीर्तन आदी कार्यक्रम दुसऱ्या दिवशी संपन्न झाले. त्र्यंबकेश्वर मठ येथील पिरजी योगी गणेशनाथ महाराज यांच्या हस्ते कलशपूजन, टाकेश्वर मठाधिपती परमपूज्य फुलनाथ महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी संत पूजन झाले. यावेळी चेरवली मठ येथील परमपूज्य बालकनाथ महाराज ,संगमेश्वर मठ येथील परमपूज्य गोपीनाथ महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्वांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेलारी गाव आणि दहिगाव परिसर यांनी आथक परिश्रम घेतले.

# वानरांच्या हल्यात दुचाकी स्वार जखमी

## बेसुमार वृक्षतोडीमुळे वन्य प्राणी सैरभैर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड :मुरबाड तालुक्यात मुंबईस्थित धनदांडग्यांनी बंगलो बांधण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी अल्पदरात खरेदी करुन तेथे बंगले बांधण्यासाठी मुळासकट झाडे उखडून टाकण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू केले असल्याने घनदाट जंगले नष्ट झालेली दिसुन येत आहेत.

एकेकाळी माळशेज घाट, नाणेघाट तसेच शिरोशी परिसरात दिवसा ढवळया वाघांच्या डरकाळया ऐकायला येत होत्या परंतु मुंबईतील धनदांडगे व जंगलं ठेकेदारांनी बेसुमार वृक्षतोड केल्याने जंगले नष्ट झाल्याने वन्यप्राणी सैरभैर झाले असुन वन्यप्राणी जंगलातून मानवी वस्तीकडे धाव घेताना निदर्शनास येत आहेत परिणामी वन्यप्राणी दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या दुचाकी स्वारावर जिवघेणा हल्ला करण्याच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे याचाच परिणाम म्हणून तालुक्यातील वैशाखरे गावातील राहुल बांगारा हा तरुण टोकावडे पासून जवळच असलेल्या कोचरे येथे आपल्या सहकाऱ्या सोबत कामानिमित्त जात असताना वानराने झडप घातली असता राहुल व त्याचा साथीदार राम वाघ दुचाकीवरून खाली कोसळल्याने राहुल बांगारा मोठ्या प्रमाणात जखमी झाला असून राहुल बांगारा याच्यावर सध्या मुरबाड येथील रॉयल रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# रस्त्याच्या कामात फेरीवाल्यांचा अडथळा

## काम पूर्ण करण्याची व्यापारी मंडळाची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : शहरातील रविवारी भरविणाऱ्या परप्रांतीय फेरीवाल्यांच्या विळख्यातून मुक्तता करून उर्वरित मुख्य रस्त्याचे काम पूर्ण करावे अशी मागणी व्यापारी मंडळाच्या वतीने ग्रामपंचायत विभाग व पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

वासिंद शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यातच अनेक समस्याही निर्माण होत आहेत. त्याचबरोबर येथे मुख्य रस्त्यावर व बाजूच्या जागेत रविवारचा बाजार भरविण्यात येत आहे. या बाजारात बसणाऱ्या परप्रांतीय फेरीवाल्यांमुळे अनेक पाकीटमारी व दुकान, बंद घरांची टेहळणी होत असते. तसेच या होणाऱ्या गर्दीमुळे महिलांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असून यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीही होत आहे.

या भरणाऱ्या बाजारामुळे शहरात खरेदी व कामानिमित्ताने ये-जा करणाऱ्या नागरीकांना व शाळकरी विद्यार्थी, रुग्णधारक यांना त्रासदायक ठरत आहे. त्यामुळे रविवारी बसणाऱ्या या परप्रांतीय फेरीवाल्यांच्या विळख्यातून मुक्तता करून शहरातील मुख्य बाजारपेठ नाक्या पासून ते हॉटेल चक्रधारी पर्यंतच्या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी येथील व्यापारी मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता



**जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे बारावीच्या परीक्षार्थींचे गुलाबपुष्प देऊन स्वागत**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप मध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागतगोवेली (प्रतिनिधी): विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत दहावी आणि बारावीचा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असतो. अनेक विद्यार्थी या काळात चिंताग्रस्त आणि तणावामध्ये असल्याचे दिसून येते आणि आज दिनांक 11 फेब्रुवारी 2025 रोजी इयत्ता बारावी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेला सुरुवात झाली. सुरुवातीच्या पेपरपासूनच विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि उत्साहाने सुरुवात करावी यासाठी जीवनदीप महाविद्यालय गोवेली या परीक्षा केंद्रावर जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष, शिक्षण प्रेमी रवींद्र घोडवींदे यांनी स्वतः विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांचे स्वागत केले. तसेच यावेळी प्राचार्य प्रकाश राहणे प्रा हरेंद्र सोष्टे, चिंतामन मगर, महेश विशे, रवींद्र जाधव यांच्या सह सर्व प्राध्यापक प्राध्यापिका यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळालं

# वैद्यकीय महाविद्यालय सुरू सुरू होताच
# जी. टी. रुग्णालयात रुग्णसंख्येत वाढ



**जी.टी. रुग्णालयाचे वैद्यकीय महाविद्यालय रुपांतर झाल्यापासून रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. पुढील काही दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये कार्डिओलॉजी, न्यूरोलॉजी विभागाबरोबरच कॅथलॅब, पाच खाटांचे रक्तशुद्धीकरण केंद्र, मॉड्यूलर अतिदक्षता विभाग सुरू करण्यात येणार आहे. रुग्णालयातील वाढत्या व अद्ययावत सोयी – सुविधांमुळे भविष्यात रुग्णांच्या संख्येत अधिक वाढ होण्याची शक्यता डॉ. जीतेंद्र संकपाळ यांनी व्यक्त केली.**

**उपचार करण्यात आलेले रुग्ण**

जुलै – ३६ ,
ऑगस्ट – ८७०
सप्टेंबर – ११३४
ऑक्टोबर – ११०६
नोव्हेंबर – ७१८
डिसेंबर – ७२८

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जी. टी. रुग्णालयात वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यानंतर तेथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. जी. टी. रुग्णालयातील आपत्कालीन विभागामध्ये जुलै – डिसेंबर २०२४ या कालावधीत तब्बल ४ हजार ५९२ रुग्णांवर उपचार करण्यात आले. यापैकी अनेकांवर प्राथमिक उपचार करण्यात आले, तर प्रकृती गंभीर असलेल्या रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. दक्षिण मुंबईतील जी.टी. रुग्णालयाला जुलै २०२४ मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे जी.टी. रुग्णालयामध्ये टप्प्याटप्प्याने अद्ययावत व आधुनिक सोयी – सुविधा उपलब्ध करण्याची प्रक्रिया सुरू झाली. जी. टी. रुग्णालयामध्ये नवीन सीटी स्कॅन विभाग सुरू करण्यात आला. शस्त्रकियागृहाचे अद्ययावतीकरण करण्यात आले. सहा नवीन शस्त्रक्रियागृह उभारण्यात येणार आहेत. त्याचबरोबर २३ अनुभवी प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक यांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे इंडोस्कोपी, लॅप्रोस्कोपी, यकृत, पाठीचे मणके, कान – नाक – घसा, नेत्रविभागातील यंत्रसामग्री अद्ययावत करण्यात येत आहे. अपघात विभाग मॉड्यूलर करण्यात आला असून त्याला संलग्नित सहा खाटांचा आपत्कालिन विभाग सुरू करण्यात आला. त्याचबरोबर डे केअर सुविधाही सुरू करण्यात आली आहे. त्याचबरोबर अनेक नव्या सोयी-सुविधा पुढील काही काळात रुग्णालयामध्ये सुरू होणार आहे. जी. टी. रुग्णालयातील वाढत्या सोसी सुविधांमुळे रुग्णांचा उपचारासाठी कल वाढू लागला आहे. त्यातूनच जुलै – डिसेंबर २०२४ या कालावधीत रुग्णालयात ४ हजार ५९२ रुग्णांनी आपत्कालीन विभागामध्ये उपचार घेतले. यापैकी २ हजार २९६ रुग्णांना डे केअर सुविधेअंतर्गत उपचार करून घरी पाठविण्यात आले. तर १ हजार ७२९ रुग्णांवर उपचार करून त्यांना पुन:उपचारासाठी (फॉलोअप) बोलविण्यात आले. तसेच आपत्कलिन विभागात आलेल्या ५६७ रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. या रुग्णांवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार करण्यात आल्याची माहिती जी.टी. रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जीतेंद्र संकपाळ यांनी सांगितले.

# धावत्या लोकलमध्ये मोबाईलचा स्फोट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: लोकल ट्रेनच्या महिला डब्यात एका अज्ञात महिला प्रवाशाच्या मोबाईल फोनचा स्फोट झाल्याची मोठी घटना घडली आहे. यामुळे लोकलमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला होता. एका नागरी अधिकाऱ्याने याबाबतची माहिती दिली आहे. मात्र, या घटनेत सुदैवाने कुठल्याही प्रकारची जीवितहानी घडलेली नाही.

सोमवारी (१० फेब्रुवारी) रात्री ८ वाजून १२ मिनिटांनी कळवा स्थानकावर सीएसएमटी-कल्याण उपनगरीय ट्रेनमध्ये झालेल्या या घटनेत कोणीही जखमी झालेलं नाही, असे ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख यासिन तडवी यांनी पीटीआयला सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या वृत्तानुसार, या घटनेत कोणीही जखमी झाले नाही.

मात्र यामुळे प्रवाशांमध्ये क्षणिक गोंधळ उडाला, अशीही माहिती त्यांनी दिली. मोबाईलच्या स्फोटामुळे लोकलमध्ये धुराचे लोट पसरले, फोन स्फोट झाल्यामुळे लोकलमध्ये धुराचे लोट पसरले होते आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांनी अग्निशामक साधनांचा वापर केला, असे त्यांनी सांगितले आहे.

# ठाण्यातील मंदिरातील दानपेट्यांची चोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : किसननगर येथील ५० वर्ष जुन्या मंदिरातील दानपेट्या चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या दानपेट्यांमध्ये साडेपाच हजार रुपयांची रोकड होती. याप्रकरणी मंदिरातील व्यवस्थापकांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किसननगर येथील पाडा क्रमांक एक परिसरात मंदिर आहे. मंदिराला मुख्य प्रवेशद्वार असून मंदिराच्या मागील बाजूस दोन दरवाजे आहे. भाविकांसाठी दररोज सकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत मंदिराचे प्रवेशद्वार दर्शनासाठी उघडे केले जातात. हे मंदिर ५० वर्ष जुने असल्याने भाविक मोठ्याप्रमाणात याठिकाणी येत असतात. मंदिरात एकूण नऊ लाकडी दानपेट्या आहेत. रविवारी रात्री ९ नंतर पुजाऱ्याने मंदिर बंद केले होते. सोमवारी पहाटे ५.३० वाजता मंदिर उघडले असता, मंदिरातील सात दानपेट्या गायब झालेल्या होत्या. पुजारी आणि व्यवस्थापकांनी पाहणी केली असता, मंदिराच्या मागील बाजूचा दरवाजा तुटलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यानंतर व्यवस्थापकांनी श्रीनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या प्रकरणी चोरीचा गुन्हा दाखल झाला असून एकूण साडेपाच हजार रुपये दानपेट्यांमध्ये होते असे तक्रारीत म्हटले आहे.

# दहिसर टोलनाक्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अवजड वाहनांना बंदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भाईंदर : दहिसर टोल नाक्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मुंबईच्या दिशेने येणाऱ्या अवजड वाहनांना सकाळी ७.४५ ते ११. ४५ पर्यंत वरसावे पुलाजवळील चौकीनंतर बंदी घालण्यात आली आहे. याबाबतची अधिसूचना सोमवारी मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाने प्रसिध्द केली आहे.

दहिसर टोलनाक्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होते. यासाठी राज्य शासनाने चारचाकी हलक्या वाहनांना पथकर माफी देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यानंतरही दहिसर टोल नाक्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटला नव्हता. टोल नाक्यावर अवजड वाहनांना तीन मार्गिका राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नव्हती.

याआधी मुंबई शहरात प्रवेश करणाऱ्या अवजड वाहनांना सकाळी ८ ते ११.३० सुमारास अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे अवजड वाहने टोलनाक्याच्या अलीकडे उभी राहत होती. परिणामी दहिसर टोलनाक्यावर वाहतूक कोंडी व्हायची. त्यामुळे ही समस्या मार्गी लावण्यासाठी मुंबईच्या दिशेने येणाऱ्या अवजड वाहनांना सकाळी ७.४५ ते ११. ४५ पर्यंत वर्सोवा पुला जवळील चौकीनंतर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वरसावे पोलीस चौकी फाऊटन हॉटेल ते दहिसर टोलनाका तसेच ठाणे घोडबंदर मार्गे मिरा भाईंदर शहरात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. यामुळे मिरा भाईंदर आणि ठाणे शहरात होणारी वाहतूक कोंडीची समस्या मार्गी लागणार असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे. याबाबतची अधिसूचना मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपायुक्त (मुख्यालय) सुहास बावचे यांनी ही अधिसूचना प्रसिध्द केली आहे

सोमवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दहिसर टोल नाक्याची पाहणी करून ही समस्या न सुटल्यास टोल नाका फोडून टाकण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे शासकीय यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या आणि अवजड वाहनांना बंदी घालण्याची अधिसूचना सोमवारी पोलिसांकडून प्रसिध्द करण्यात आली.

# या आर्थिक वर्षात पस्तीस हजार
# रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : चालू आर्थिक वर्षात जानेवारी २०२५पर्यंत मध्य रेल्वेच्या उपनगरी गाड्यांच्या ३५ हजार फेऱ्यांचे वेळापत्रक कोलमडल्याचे स्पष्ट झाले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा विलंबाने धावलेल्या गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये सहा हजारांनी वाढ झाली आहे. याचा फटका नोकरदार, रुग्ण, विद्यार्थी, छोट्या व्यापाऱ्यांना बसला.

गाड्यांची अपुरी संख्या आणि अवेळी धावणाऱ्या उपनगरी रेल्वेगाड्यांमुळे 'एमएमआर' प्रदेशातील गर्दीचा भार पेलणे अशक्य झाले आहे. प्रचंड गर्दीच्या वेळी धावत्या गाड्यांमधून पडून प्रवाशांचा मृत्यू होण्याच्या घटना वाढल्या आहेत. उपनगरी रेल्वेगाड्यांच्या ऐवजी लांब पल्ल्याच्या गाड्यांना प्राधान्य, तांत्रिक बिघाड, पायाभूत कामे, आपत्कालीन ब्लॉकमुळे रेल्वेसेवा कोलमडल्याने तुडुंब गर्दीने भरलेल्या उपनगरी गाड्यांमध्ये प्रवाशांना ये-जा करावी लागत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवासी, आजारी प्रवाशांना उपनगरी गाड्यांचा खोळंबा असह्य होऊ लागला आहे. मध्य रेल्वेवर उपनगरी गाड्यांच्या दररोज १,८१० होतात, असा दावा प्रशासनाने केला आहे.

मात्र, यापैकी बहुसंख्य फेऱ्या रद्द करण्यात येतात. अनेक उपनगरी गाड्या वेळेवर धावत नाहीत. रेल्वेतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२४-२५ या आर्थिक वर्षात जानेवारी २०२५ पर्यंत सुमारे ३५ हजार फेऱ्या उशिराने होत्या.

## लांबपल्ल्याच्या गाड्यांना प्राधान्य

लांबपल्ल्याच्या गाड्यांना प्राधान्य दिल्याने उपनगरी रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक कोलमडत आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात सुमारे ४ हजार फेऱ्या लांबपल्याच्या गाड्यांमुळे विलंबाने धावल्या. तर, २०२३-२४ या आर्थिक वर्षात उपनगरी गाड्यांच्या ३ हजार फेऱ्या निश्चित वेळापत्रकानुसार नव्हत्या. लांबपल्ल्याच्या गाड्यांना प्राधान्य दिल्याने उपनगरी रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक कोलमडत आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात सुमारे ४ हजार फेऱ्या लांबपल्याच्या गाड्यांमुळे विलंबाने धावल्या. तर, २०२३-२४ या आर्थिक वर्षात उपनगरी गाड्यांच्या ३ हजार फेऱ्या निश्चित वेळापत्रकानुसार नव्हत्या.

## कल्याणकरांचेही हाल

**कल्याण रेल्वे स्थानकात कसारा आणि कर्जत दिशेकडे जाणाऱ्या लांबपल्ल्याच्या गाड्या थांबतात. त्यामुळे उपनगरी गाड्यांसाठी मार्ग उपलब्ध होत नाही. कल्याण-ठाकुर्ली दरम्यान बराच वेळ उपनगरी गाड्या उभ्या राहतात. त्यामुळे प्रवाशांना वेळेत कल्याण स्थानक वेळेत गाठता येत नाही. रुळ ओलांडताना प्रवाशांचा होणाऱ्या अपघातांमुळे उपनगरी गाड्यांचा वक्तशीरपणा कमी होत आहे. तसेच समांतर रस्ता फाटकावरील (लेव्हल क्रॉसिंग गेट) वाहनांची वाहतूक अतिरिक्त काळ सुरू आहेत.**



# समान काम – समान वेतनासाठी बेस्ट कर्मचाऱ्यांचे आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : बेस्ट उपक्रमातील डागा ग्रुप, मातेश्वरी अर्बन ट्रान्सपोर्ट सोल्यूशन्स, बी.व्ही.जी. इंडिया व इतर खासगी कंपन्यांमार्फत चालविण्यात येणाऱ्या बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांवर कार्यरत कर्मचारी 'समान कामाला, समान वेतन' व इतर मागण्यांसाठी २५ फेब्रुवारी रोजी आझाद मैदानात संघर्ष कामगार कर्मचारी युनियनच्या नेतृत्वाखाली आंदोलन करणार आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट उपक्रमाच्या परिवहन विभागात सार्वजनिक बस सेवा देण्यासाठी कायम सेवेत असलेल्या कामगारांचे आणि खासगी कंपन्याद्वारे कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांचे काम एक सारखेच आहे. तसेच हे काम बारा महिने, कायम स्वरुपाचे असल्याने व काम कायम चालणारे असल्याने, कंत्राटी कर्मचाऱ्यांना 'समान कामाला, समान वेतन' या तत्तानुसार बेस्ट उपक्रमामधील कायम आणि नियमित कामगारांना लागू असलेले वेतनमान व इतर सेवाशर्ती तातडीने लागू कराव्या व इतर मागण्यांसाठी २५ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता आझाद मैदानावर मोर्चा काढण्यात येणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री, नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे आणि मुंबई महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देण्यात येईल, असे संघर्ष कामगार कर्मचारी युनियनचे सरचिटणीस शशांक राव यांनी सांगितले.

# अभ्यासाच्या ताण विद्यार्थ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पनवेल : अभ्यासाच्या ताणामुळे एका विद्यार्थ्याने दुचाकी घेऊन पनवेल शीव महामार्गावर विरुद्ध दिशेने दुचाकी चालवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना सोमवारी रात्री सव्वासात वाजता रोडपाली येथील पुरुषार्थ उड्डाणपुलावर घडली. सुदैवाने या अपघातामध्ये संबंधित विद्यार्थी बचावला आहे. मात्र त्याची प्रकृती अजूनही अत्यवस्थ आहे. त्याच्यावर नजीकच्या कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघाताबाबत कामोठे पोलीस ठाण्यात रितसर सोमवारी रात्री गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संबंधित विद्यार्थी हा दुचाकीने आत्महत्या करण्याच्या उद्देशाने शीव पनवेल महामार्गावर विरुद्ध दिशेने प्रवास करत होता.

संबंधित व्हॅगनर मोटारीचे आणि दुचाकीचे सुद्धा या अपघातामध्ये मोठे नूकसान झाले. रोडपाली उड्डाणपुलावर मुंबईच्या दिशेने जाण्याच्या मार्गिकेवर विद्यार्थ्याने दुचाकी चढविली. रात्रीच्यावेळी या उड्डाणपुलावर मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने वाहन धावतात. त्याच वाहनांच्या गर्दीत हा अपघात घडला. व्हॅगनर मोटारीला ठोकल्यानंतर जखमी दुचाकीस्वाराची चौकशी केल्यावर जखमी मुलाने 'माझी तब्येत बरी नाही, माझा अभ्यास होत नाही.

मला आत्महत्या करायची', अशी व्यथा एकल्यानंतर जमलेल्या प्रवाशांनी तातडीने पोलीसांना बोलावले. कामोठे पोलीस सुद्धा काही मिनिटांतच तेथे पोहचले. पोलीसांनी इतर जमलेल्यांनी व्यक्तींच्या मदतीने जखमी विद्यार्थ्याला रुग्णालयात दाखल केले.

या दरम्यान पोलीसांनी विद्यार्थ्याच्या पालकांना संपर्क साधला. रात्री उशीरापर्यंत हा विद्यार्थी बेशुद्ध अवस्थेमध्ये होता. या संवेदनशील घटनेचा तपास कामोठे पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रियंका खरटमल या करीत आहेत. पोलीस अधिकारी खरटमल या संबंधित विद्यार्थ्याने असे का केले असावे, याचा शोध घेत आहेत.

केडीएमसी शाळांमध्ये
# १२वी परीक्षेच्या कॉपीमुक्तीसाठी विशेष पथके

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात इयत्ता बारावीचे परीक्षा केंद्र असलेल्या शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये आज पासून इयत्ता 12वीच्या परिक्षा सुरु होत आहेत. यासाठी इयत्ता 12वीच्या परीक्षेत बसणा-या कॉपी बहाद्दर विद्यार्थ्यांवर करडी नजर ठेवण्याकरीता महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार व शिक्षण विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांच्या नियंत्रणाखाली 3 बैठे पथक व 2 भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्रात इयत्ता 12वीच्या परीक्षा सुरळीत पार पडण्याच्या दृष्टिकोनातून मागील काही वर्षात ज्या शाळांमध्ये कॉपीचे प्रकार घडले आहेत, अशा ठिकाणी विशेष बैठे पथक नियुक्त केले आहेत. तर प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण व शिक्षण अधिकारी विजय सरकटे यांच्या नियंत्रणाखाली फिरते पथक कार्यरत आहे. यामुळे कॉपी करणाऱ्यांवर आळा बसेल.


महाराष्ट्र शासन
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, कल्याण तालुका, कल्याण**

मल्हार संकूल बिल्डींग, ए टाईप, बी विंग, पहिला मजला, मोहिंदर सिंग हायस्कूलजवळ, आग्रारोड, घोडेखोत आळी, कल्याण (पश्चिम) दुरध्वनी क्र. 0251-2209908 Email ID- deputyregistrarkalyan@gmail.com

**-: जाहीर पेपर नोटीसः-**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब-२९ अन्वये जाहिर नोटीस**

ज्याअर्थी, पारिजात लोकवाटीका को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., लोकवाटीका हौसिंग कॉम्प्लेक्स, कल्याण (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे-४२१३०६ या संस्थेच्या खालील थकबाकी सभासद यांचेविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब-२९ अन्वये वसुली दाखला मिळणेबाबत या कार्यालयात अर्जदार संस्थेने अर्ज दाखल केलेले आहेत. सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दि.०४/०३/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे. खालील तक्त्यात उल्लेखलेल्या कर्जदार व जामीनदार यांनी सदर सुनावणीचे दिवशी उपस्थित राहून आपले लेखी तोंडी म्हणणे सादर करावे, सदर सुनावणीस आपण गैरहजर राहील्यास दाव्यांबाबत उपलब्ध कागदपत्रांवरून एकतर्फी निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी,

| अनु. | दावा नं | कर्जदार व जामिनदारांची नावे | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ४८/२०२४-२५ | **श्री. शशिकांत वी. परब (थकबाकीदार)**<br>१. रा. इमारत क्र. अ/४, सदनिका क्र. १२७, पारिजात लोकवाटीका को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., लोकवाटीका हौसिंग कॉम्प्लेक्स, कल्याण (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे-४२१३०६<br>२. निसर्ग एसआरए को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., इमारत क्र. ब. सदनिका क्र. ११०४, ११ वा मजला, भोईवाडा, जेरबाई वाडिया रोड, परेल, मुंबई-४०००१२ | ७०,०३९/- |
| २. | ५२/२०२४-२५ | **श्री. सुभाष म. चंदालिया (थकबाकीदार)**<br>रा. इमारत क्र. अ/२, सदनिका क्र. ००९, पारिजात लोकवाटीका को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., लोकवाटीका हौसिंग कॉम्प्लेक्स, कल्याण (पूर्व), ता. कल्याण, ठाणे-४२१३०६ | ३,०७,९९६/- |

शिक्का

दिनांक : १०/०२/२०२५
ठिकाण : कल्याण

**सही/-**
**(विशाल जाधवर)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, कल्याण तालुका कल्याण**

* जा.क्र.उपनि/कल्याण/बी-४/पारिजात लोकवाटीका/ हौ.क.१०१ जा.पे. नोटीस २९७३/ सन २०२५ दि. १०/०२/२०२५

# मुंबई-पुणे मिसिंग लिंकचे काम त्वरित करा - राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील महत्वाकांक्षी मिसिंग लिंक प्रकल्पाची नुकतीच पाहणी केली. या दौऱ्यात त्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला तसेच प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आणि ऑगस्ट २०२५ अखेर प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, प्रकल्प दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावा यासाठी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील बोरघाटात वाहतूक कोंडी आणि अपघात होतात. तसेच, पावसाळ्यात येथे दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे वाहतुकीला अडथळे येतात. हे लक्षात घेऊन, हा नवीन मार्गिका प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.मिसिंग लिंक प्रकल्प पूर्ण झाल्यास मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सोयीस्कर होईल, असा विश्वास राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

एकूण सुधारित मार्ग: खालापूर ते खोपोली इंटरचेंज आणि खोपोली एक्झिट ते कुसगाव (सिंहगड संस्था) दरम्यानचा भाग आहे.यामध्ये सध्याचे १९ किमीचे अंतर ६ किमीने कमी होऊन १३.३ किमी इतके होणार आहे. प्रवासाच्या वेळेत २०-२५ मिनिटांची बचत,इंधन बचत आणि वायू प्रदूषणात घट,घाट रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि अपघातांची शक्यता कमी होण्यास मदत होणार आहे.

# मॉ साहेबांचे संस्कार,छत्रपतींचे आदर्श आम्ही विसरतोय

## - शिवव्याख्याते अमर राऊत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : अखंड हिंदूस्थानची राष्ट्रमाता ,स्वराज्य जननी मां साहेब जिजाऊंनी दिलेल्या संस्कारामुळे छत्रपती शिवराय घडले आणि हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली तर छत्रपतींचा आदर्श आम्ही विसरलो म्हणून आपली आज वाताहात झाली आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध शिवव्याख्याते अमर राऊत यांनी मुरबाड येथे केले. जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निलेशजी सांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड शहराध्यक्ष अतुल तेलवणे यांनी मुरबाड शहरातील बागेश्वरी चौक येथे शिव व्याख्यानाचे आयोजन केले होते.यावेळी अमर राऊत पुढे बोलताना म्हणाले जिजाऊने एक आदर्श पुत्र, आदर्श लोककल्याणकारी राजा निर्माण केला. शिवरायांचा आदर्श, त्यांचे संस्कार, त्याग, पराक्रम, शौर्य आपण फक्त वाचतो पण आचरणात आणत नाहीत हेच




आपले मोठे दुर्दैव आहे.शिवाजी जन्माला यावा पण तो दुसऱ्याच्या घरात ही मानसिकता बदला. शिवरायांना मानतो, पुजतो, वाचतो, रेखाटतो,जयंती साजरी करतो पण त्यांचे विचार, दुरदृष्टी आत्मसात करत नाही ही काळाची गरज आहे असे परखड विचार यावेळी उपस्थित शिवप्रेमी समोर आपल्या पहाडी शैलीत मांडले. या कार्यक्रमासाठी मुरबाड शहरातील दानशूर व्यक्तीमत्व महेबुबभाई पैठणकर, भाजपा शहराध्यक्ष सुधिर तेलवणे, रिपाई तालुका अध्यक्ष दिनेश उघडे, माजी नगराध्यक्ष तथा उद्योजक मोहनशेठ सासे, कृष्णकांत मलिक, पत्रकार दिलीप पवार, चेतन पोतदार, रूपेश गुजरे,जिजाऊ संघटनेचे सज्जन जमदरे, सौ.अश्विनी बोंबले, सागर कार्ले, जगदिश पष्टे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवप्रेमी, महिला व नागरिक उपस्थित होते तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैभव मसणे यांनी केले. यावेळी जिजाऊ संघटनेच्या वतीने आरोग्य सेवेत मोलाचे योगदान दिलेल्या ताराबाई घायवट यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# वसईतील विकास कामांची भुमिपूजने

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर :लोकनेते व माजी आमदार यांच्या नेतृत्वाखाली व क्षितिज ठाकूर माजी आमदार यांच्या सहकार्याने आणि राजेश पाटील माजी आमदार यांनी आपल्या कारकिर्दीत अविरतपणे प्रयत्न करून, वेगवेगळ्या सरकारी निधीतून व MMRDA कडून मंजूर करण्यात आलेल्या वसई तालुक्यातील, भाताणे-आडणे रस्त्याच्या विकासकामाचे भूमिपूजन भाताणे येथील तलाव परिसरात राजेश पाटील यांच्या हस्ते व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडले.

यावेळी राजेश पाटील माजी आमदार यांनी सांगितले, गेल्या अनेक वर्षांपासून खराब स्थितीत असलेल्या या रस्त्याचे काम.



भाताणे नवसई येथील नदीपासून गावापर्यंत डांबरीकरण, तसेच तलावाच्या पुढेल रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण असे दोन टप्प्यांत काम होणार आहे. हा रस्ता यापूर्वी PMGSY विभागाच्या अखत्यारीत असल्याने दुरुस्तीला विलंब होत होता. MMRDA विभागाशी सतत पत्रव्यवहार व पाठपुरावा करून रु. ६ कोटी निधी त्यासाठी मंजूर करून आणलेला आहे. तर पुढील टप्प्यात आडणे ते कळभोण रस्त्यासाठी रु.१२ कोटींचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवलेला आहे. शिरसाड-अंबाडी रस्ता पी डब्ल्यू डी यांच्या कडून हस्तांतरित करून घेतला असून एम. एम. आर. डी. यांच्या मार्फत कॉंक्रीटीकरण करण्यासाठी अंदाजे ४५० कोटी रुपयांचा निधी मंजूराधीन आहे. भालवली- जांबूळपाडा ते विरार रस्ता वाढत्या रहदारी मुळे १२ फुटी करण्यासाठी विचाराधीन आहे. असेही राजेश पाटील यांनी सांगितले. या भागात रस्त्याच्यां कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

भूमिपूजन सोहळ्याला माजी आमदार राजेश पाटील सह, अशोक पाटील वसई पंचायत समितीचे सभापती, भाताणे सरपंच हितेश बाडगा, उपसरपंच हेमराज कासार, प्रणय कासार कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक. माजी सभापती सुगंधा जाधव, माजी जि. प. सदस्या रंजना सायरे. ग्रामपंचायत सदस्य योगेश कुडू, सुदाम कुडू, अशोक कुडू, सुभाष कासार, सुभाष पाटील, भाऊ काका, सलीम शेख, रूपेश पागी, संजय कासार, रवी कासार, मोरेश्वर जाधव यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर ,ग्रामस्थ व महिला वर्ग उपस्थित होता.

# आ.सुलभा गायकवाड यांचा जनता दरबार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील तिसाई हाऊस येथे रविवारी भाजपा आमदार सुलभा गणपत गायकवाड यांच्या वतीने जनता दरबार घेण्यात आला. जनता दरबारात आपले गार्हाणे मांडण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. भाजपच्या आमदार सुलभा गणपत गायकवाड यांनी मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या जनता दरबारात ऐकून घेत त्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार असून छोट्या, स्वरूपाच्या समस्यांसाठी त्यांनी तत्काळ अधिकार्यांशी फोनवरून संपर्क साधून त्या समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याच्या सूचना संदर्भीत आधिकार्याना दिल्या.

जनता दरबारमध्ये मतदारसंघातील स्त्रियांपासून अबाल वृद्ध मंडळी आपल्या समस्या घेऊन आमदार सुलभा गायकवाड यांना त्या सोडवण्यासाठी गार्हाणे सांगितले. गायकवाड यांनी त्यांच्या समस्या ऐकून शक्य तितक्या लवकर निवारण



करण्याचे आश्वासन यानिमित्ताने दिले. संभाषणादरम्यान आमदार सुलभा गायकवाड म्हणाल्या की, जनता दरबार विशेषत: मतदारसंघातील नागरिकांसाठी ठेवण्यात आला आहे, जो माजी आमदार गणपत गायकवाड यांच्या कार्यकाळापासून सुरू आहे. जनता दरबारासाठी मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने जनता दरबारमध्ये हजेरी लावली आणि आमदार सुलभा गायकवाड यांच्या समोर आपल्या समस्याची कैफियत मांडली. गायकवाड यांनी अधिकारी वर्गाशी संपर्क साधत काही समस्या मार्गी लावल्या तर काही मोठ्या समस्या बाबत आपण पाठपुरावा करून निराकरण करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

# एकशेबारा क्रमांक आपल्या मैत्रिणींना द्या

## - जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. जयपाल पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : आपल्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र पोलिसांचा एकशेबारा क्रमांकाचा वापर तुम्ही करा आणि आपल्या मैत्रिणींना ही माहिती द्या असे मार्गदर्शनपर विचार जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. जयपाल पाटील यांनी मांडले.

पिवळी येथील श्रीमती एस.एस. देशमुख हायस्कूल आणि किल्ले माऊली ज्युनिअर विद्यालय आयोजित दहावी व बारावी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ आयोजित कार्यक्रमात पाटील यांनी आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. जेव्हा तुम्ही बाहेर शिक्षण व कामानिमित्ताने जाता-येता त्यावेळी असुरक्षित वाटले तर अशावेळी आपण महाराष्ट्र पोलिसांचा 112 क्रमांकाचा



वापर तुम्ही करा आणि तसेच सदरची माहिती आपल्या मैत्रिणींनाही द्या असे प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी म्हटले. तसेच शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कायद्याची, घरातील गॅस, फ्रिज, इलेक्ट्रिकल वस्तू पासून घेण्याची काळजी, शेतकऱ्यांसाठी शासनाकडून मिळणाऱ्या स्वर्गीय गोपीनाथ मुंडे विमा योजना व बाळंतपणासाठी शासकीय रुग्णालयात ने-आण करण्याकरिता 102 रुग्णवाहिकेचा वापराबद्दल माहिती देऊन रुग्णांना डोंगर माथ्यावरून कसे आणावयाचे याचे प्रात्यक्षिक डॉ.जयपाल पाटील यांनी दाखविले. तसेच या कार्यक्रमादरम्यान 112 क्रमांक व 102 चा प्रत्यक्षपणे डायल केल्यानंतर पोलिस व रुग्णवाहिका येथे उपलब्ध झाल्याचे संस्थेचे चेअरमन मधुकर देशमुख यांनी म्हटले.

यावेळी व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते अशोक जगे, संस्थेचे चेअरमन मधुकर देशमुख, शाळेचे माजी विद्यार्थी चार्टर्ड अकाउंटंट पंकज गोधडे, संस्थेचे सचिव अनिल देशमुख, केंद्र प्रमुख नवनाथ जाधव, प्रभारी मुख्याध्यापक विष्णू धानके आदिजण उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय बोरुडे, आपत्ती सुरक्षा मित्र विकास रणपिसे, ओंकार देशमुख, शिक्षक शिक्षकेतर व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# गद्दारांना राजकारणातून संपवा

## - शेकाप नेते जयंत पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : कार्यकर्त्यांनी आता सावध राहून काम केले पाहिजे. विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे संजय राऊत यांनी मिडिया समोर येऊन अलिबाग, पेण आणि पनवेलची जागा शेकापला सोडली गेली असून उरणच्या जागेबाबत बोलणे चालू असल्याचे घोषित केले होते. मात्र आयत्या वेळी शिवसनेने याच जागांवर आपले उमेदवार उभे करून आमच्याशी गद्दारी केली आहे असे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे पेण मध्ये जो शेकापने आमदार निवडून दिला तो त्याचे स्वार्थ साधून आपला पक्ष सोडून गेला. मात्र आता आजच्या तरुण कार्यकर्त्यांनी या गद्दारांना राजकारणातून हद्दपार करण्यासाठी सज्ज व्हा,पेणमध्ये उदया उगवणारा सूर्य आपलाच आहे असे सांगुन प्रामाणिक कार्यकर्ता आणि निष्ठेने काम करणाऱ्या तसेच पक्ष न बदलणाऱ्या कार्यकर्त्यांनाच पदे द्या असे शेकाप नेते भाई जयंत पाटील यांनी पेण येथील शेकाप मेळाव्यात बोलताना सांगितले.

आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेऊन आणि शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये काम करण्याचा उत्साह निर्माण करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने संपूर्ण रायगड जिल्हयात कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज पेण तालुक्यातील आगरी समाज हॉल येथे पेणमधील कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना भाई जयंत पाटील यांनी उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसेनेवर नाराजी व्यक्त करत विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेनेने आयत्या वेळी आमच्याशी गद्दारी केली असल्याचे सांगुन आता यापुढे कोणताही गद्दारी सहन केली जाणार नाही असे स्पष्ट केले. यावेळी व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये एक नवचैतन्य निर्माण व्हावे आणि त्यांना पुन्हा एकदा कामाला लागण्यासाठी त्यांना योग्य त्या सूचना देण्यासाठी आज पेणमध्ये हा कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता.

# जमिनीच्या वादातून भावानेच केला भावावर हल्ला



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मार्केट मध्ये शेतक-यावर पहाटे हल्ला करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी जखमीच्या सख्या मोठ्या भावाला महात्मा फुले चौक पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी सलग ३ दिवस कसोशीने तपास करून सी.सी.टी. व्ही. फुटेजच्या आधारे व तांत्रीक विश्लेषनाच्या आधारे अटक केली आहे.

गुरुवारी पहाटे ५ च्या सुमारास कल्याण मधील सापाड गांव येथील बारकु मढवी वय ५२ वर्षे, हे लक्ष्मी मार्केटच्या गेट नंबर ४ समोर बैलाला मक्याचा चारा खरेदी करण्यासाठी आलेले असतांना एका अनोळखी इसमाने अज्ञात कारणावरून त्यांच्यापाठीमागून मानेवर, तोंडावर, हातावर कोणत्यातरी धारदार हत्याराने वार करून गंभीर जखमी केले होते. याबाबत महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन येथे जखमीचा मुलगा प्रणय मढवी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

जखमी बारकु मढवी यास ज्या ठिकाणी हल्ला करून जखमी केले त्या ठिकाणाचे सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी करून त्याअनुषंगाने पुढील तांत्रीक तपास केला असता जखमी इसम बारकु मढवी व त्याचा सख्खा मोठा भाउ कृष्णा मढवी वय ५५ वर्षे यांच्यामध्ये वडीलोपार्जीत जमिनीच्या वाटणीवरून व एअरटेल कंपनीच्या टॉवरचे भाडयाचे पैसे वाटणीवरून वाद असल्याने त्यांच्यामध्ये टोकाचे वैर असल्याची माहिती मिळाली. त्याअनुषंगाने पुढे कृष्णा मढवी याच्याकडे तपास केला असता त्याने हा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. हि कामगिरी पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांच्या देखरेखीखाली सपोनि स्वप्नील भुजबळ, विनोद पाटील, पोउपनि विकास मडके, जानुसिंग पवार, पोहवा मनोहर चित्ते, अजय पाटील, महेंद्र मंझा, काशिनाथ जाधव, पोना किशोर सुर्यवंशी, आनंद कांगरे, महेंद्र पाटील, पोशि दिपक थोरात, हरीभाउ दळवे, श्रीधर वडगावे, महेश कोळी यांनी केली आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी टोल फ्री सेवा

मुंबई : केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने देशभरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी 'एल्डरलाईन - १४५६७' ही राष्ट्रीय टोल फ्री हेल्पलाइन सुरू केली आहे.

राज्यात राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान (एनआयएसडी), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येते. या हेल्पलाइन चे काम २६ जानेवारी, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर वगळता वर्षातील ३६२ दिवस आणि आठवड्याचे सर्व दिवस सकाळी ८ ते संध्याकाळी ८ पर्यंत चालते. याद्वारे आरोग्यविषयक जागरूकता, वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, पोषण, सांस्कृतिक, कला, ज्येष्ठांसंबंधी अनुकूल उत्पादने, आणि मनोरंजनाशी संबंधित माहिती पुरविण्यात येते. वैयक्तिक आणि कौटुंबिक स्तरावर कायदेविषयक, मालमत्ता, शेजारी आदींच्या अनुषंगाने वाद निराकरण, आर्थिक, निवृत्तीवेतन संबंधित सल्ला आणि सरकारी योजनांच्या माहितीच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात येते. चिंता निराकरण, नातेसंबंध व्यवस्थापन, मृत्यूशी संबंधित भीती निवारण, वेळ, ताण, राग आदीच्या अनुषंगाने जीवन व्यवस्थापन, मृत्युपत्र बनवण्याचे महत्त्व आदी मृत्यूपूर्वीचे दस्तऐवजीकरण आदी अनुषंगाने ही मदत करण्यात येते.

यासंदर्भात राज्यभरातून जेष्ठ नागरिकांसाठी चार लाखाहून अधिक मदतीचे दूरध्वनी आले आहेत. त्यामध्ये जेष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या मदत हेल्पलाइनने केली आहे. तसेच तीस हजाराहून अधिक प्रकरणे क्षेत्रीय पातळीवर यशस्वीरित्या हाताळली आहेत.

# राष्ट्रीय लोकअदालतीचे दि.२२ मार्च रोजी आयोजन

ठाणे : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास ब्रि. अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, दि.22 मार्च 2025 रोजी "राष्ट्रीय लोकअदालत" चे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधितांनी ठाणे जिल्ह्यातील ठाणे जिल्हा न्यायालय व सर्व तालुक्यातील न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी व राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घेण्यासाठी येत्या शनिवार, दि.22 मार्च 2025 रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्या. ईश्वर कां. सुर्यवंशी यांनी केले आहे.22 मार्च 2025 रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये धनादेश अनादर प्रकरणे, बँकेचे कर्ज वसूली प्रकरणे, कामगारांचे वाद, कर वसुलीचे प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक बद्दलची प्रकरणे आणि इतर आपसात तडजोड पात्र प्रकरणे, वैवाहिक व इतर दिवाणी वाद ही दाखल पूर्व प्रकरणे ठेवता येतील.न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे ठेवता येतील - आपआपसात तडजोड करण्याजोगे फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, वैवाहिक वाद, कामगारांचे वाद, भूसंपादन प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक बद्दलचे प्रकरणे, सेवा विषयक पगार, भत्ते व सेवा निवृत्तीचे फायदे-विषयक प्रकरणे, महसूल प्रकरणे, इतर दिवाणी प्रकरणे जसे भाडे, वहिवाटीचे हक्क, मनाई हुकमाचे दावे, विशिष्ट पूर्व बंध कराराची पूर्तता विषयक वाद आदी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवता येतील.

# लोकप्रतिनिधी महिला मेळाव्याचे आयोजन

## महिला अत्याचार विषयक कायद्याचं मार्गदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने पारोळ 1 येथे लोकप्रतिनिधी प्रशिक्षण व महिला मेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विविध मान्यवरांनी उपस्थित राहून महिलांना सशक्त करण्यासाठी महत्वाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास आशा चव्हाण जि. प. सदस्य, गीता पाटील माजी सभापती व पं. स. सदस्य, रमा किणी नगरसेविका, यज्ञा पाटील उपसरपंच, रवींद्र पाटील माजी उपसरपंच,कविता भूयाळ, ग्रा. प. सदस्य तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, बालविकास अधिकारी, पर्यवेक्षिका आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.या मेळाव्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या विविध योजना, महिलांसाठी POSH (Prevention of Sexual Harassment) कायदा, मोबाईल व इंटरनेट वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी व तंत्रज्ञानाच्या योग्य उपयोगाबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान सख्य संस्थाच्या शालीनी जाधव, चाईल्ड हेल्थ फाउंडेशनच्या मेरी वनमाळी, तसेच प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी व बीट पर्यवेक्षिका दीपा जाधव यांनी महिलांना सशक्तीकरणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या अखेरीस महिलांना प्रेरणादायी संदेश देणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. विशेषत: स्री भ्रूणहत्या विरोधातील जनजागृतीसाठी कु. कृतिका पाटील हिने




सादर केलेली नाटिका उपस्थितांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या मेळाव्यात बालगोपाळ, सेविका, मदतनीस तसेच स्थानिक ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. महिला सशक्तीकरण व जनजागृतीच्या दृष्टीने हा उपक्रम यशस्वी ठरला असून, अशा उपक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024